**विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या तिसऱ्या प्रवेश फेरीपुर्वी आवेदनपत्र भरण्यास, तसेच पुर्वी भरलेल्या आवेदनपत्रातील वैयक्तिक माहितीमध्ये बदल करण्यास परवानगी देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक:सीईटी-२०१८/प्र.क्र.२९४/मशि-२,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १६ ऑगस्ट, २०१८.

**वाचा:-**

(१) शासन निर्णय क्रमांक:सीईटी-२०१६/प्र.क्र.८४/मशि-२, दिनांक ७.४.२०१६.
(२) शासन अधिसूचना क्रमांक:बीएड-४६१६/प्र.क्र.१(भाग-२)/मशि-२, दिनांक ५.५.२०१७.
(३) शासन अधिसूचना क्रमांक:सीईटी-२०१५/प्र.क्र.२४३/(भाग-२)/मशि-२, दिनांक ५.५.२०१७.
(४) आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे पत्र क्र.रासाप्रपक/तिसरी फेरी/ ९९६/२०१८, दिनांक ०५.०७.२०१८.

**प्रस्तावना:-** संदर्भाधीन क्र.२ व ३ येथील नियमांमधील तरतुदीनुसार विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेश हे सामायिक प्रवेश प्रक्रियेद्वारे करण्यात येत आहेत. सदर नियमातील नियम ९ (३) मध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची (कॅपची) तिसरी फेरी आयोजित करण्याची तरतूद असून, यात उमेदवारांना संगणकीय पध्दतीने (ऑनलाईन) विकल्प नमुना भरण्यास किंवा पूर्वी भरलेल्या विकल्प नमुन्यात बदल करण्यास मुभा देण्यात आलेली आहे.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ च्या प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी झालेल्या अनेक उमेदवारांचा विद्यापीठाचा पदवी व पदव्युत्तर परीक्षेचा निकाल विलंबाने लागल्याने, ते केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचा अर्ज पूर्ण भरुन अर्जास पुष्टी देऊ शकलेले नाहीत. त्यामुळे त्यांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत भाग घेता आला नाही. परिणामी ते विधी ३ वर्ष, बी.एड, एम.एड, बी.पी.एड, एम.पी.एड अभ्यासक्रमाच्या प्रवेशापासून वंचित राहू शकतात. त्यामुळे अशा उमेदवारांना व विधी-३ वर्ष, बी.एड, एम.एड, बी.पी.एड, एम.पी.एड अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सीईटी दिलेल्या, परंतु अर्ज भरणे राहून गेलेल्या पात्र उमेदवारांना, त्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या तिसऱ्या फेरीपुर्वी ऑनलाईन अर्ज भाग-१ व २ भरण्यास परवानगी देण्याबाबत व तिसऱ्या फेरीपुर्वी पुष्टी दिलेल्या उमेदवारांना भाग-१ अर्जात वैयक्तिक बदल, जन्म तारीख, जात, गुण, अल्पसंख्यांक उमेदवारी इत्यादी मध्ये बदल करण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

Scanned by CamScanner

**<u>शासन निर्णय:-</u>** शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिताच्या व्यावसायिक विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (CET) दिलेल्या, परंतु विद्यापीठांचा पदवी व पदव्युत्तर परीक्षांचा निकाल विलंबाने लागल्याने आवेदनपत्र भरु न शकलेल्या उमेदवारांना केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत सामावून घेण्यासाठी आवेदनपत्र Online पध्दतीने भरण्यास परवानगी देण्याचा, तसेच उमेदवारांनी पुर्वी भरलेल्या अर्जामध्ये जन्म तारीख, जात, गुण, अल्पसंख्यांक उमेदवारी इत्यादि वैयक्तिक माहितीमध्ये बदल करण्यास परवानगी देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण पदवी व पदव्युत्तर अभ्याक्रमाच्या प्रथम वर्षाच्या तिसऱ्या फेरीपुर्वी प्रवेशासाठी आवेदनपत्र Online पध्दतीने भरण्यासाठी व अर्जात बदल करण्यासाठीचे अभ्यासक्रमनिहाय वेळापत्रक लगेचच जाहीर करावे.

२. अशाप्रकारे अर्ज केलेले उमेदवार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीच्या प्रवेश निश्चितीनंतर रिक्त राहिलेल्या, तसेच संस्थास्तरावरील जागांवर प्रवेशासाठी पात्र राहतील.

३. अशाप्रकारे प्रवेश अर्ज केलेल्या व पुर्वी सादर केलेल्या अर्जामध्ये वैयक्तिक बदल केलेल्या उमेदवारांची स्वतंत्र गुणवत्ता यादी असेल व या गुणवत्ता यादीनुसार तिसऱ्या फेरीतील व संस्थास्तरावरीय प्रवेश हे प्रवेश नियमातील तरतुदीनुसारच करण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( रोहिणी भालेकर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,

१) आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
२) सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ८ वा मजला, न्यु एक्सलसिअर बिल्डींग, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
३) सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
४) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
५) सर्व सह संचालक, उच्च शिक्षण (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत),
६) प्राचार्य, शासकीय व सर्व अशासकीय अनुदानित विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण महाविद्यालये (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत),
७) कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत)
८) निवडनस्ती-मशि-२.

Scanned by CamScanner